RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ६, अंक ११९] गुरुवार डिसेंबर ३, २०२०/अग्रहायण १२, शके १९४२ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २९१**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक , एक -अ आणि एक -ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सार्वजनिक बांधकाम विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ डिसेंबर २०२०.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम.**

क्रमांक खाक्षेस-२०१६/प्र.क्र.२५१(एल.बी.५१)-जी/रस्ते-८.—ज्याअर्थी, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम १५ च्या पोट-कलम (२) तसेच उक्त कलमाच्या पोट-कलम (३) आणि कलम १७ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, शासन अधिसूचना, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक खाक्षेस-२०१६/प्र.क्र.२५१ (एल.बी.४६)-जी/रस्ते-८, दिनांक ३० जुलै २०२० (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) द्वारे, सार्वजनिक प्रयोजन असलेल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग [राज्य महामार्ग (विशेष) क्र.२] (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त महामार्ग" असा करण्यात आला आहे) याचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन करणे यांसाठी, उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेली जमीन संपादित करण्याचा उद्देश घोषित केला होता; आणि उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये ज्यांच्या जमिनी समाविष्ट आहेत, अशा, उक्त जमीन मालकांकडून किंवा जमिनींच्या हितसंबंधात व्यक्तींकडून, उक्त अधिसूचना **शासन राजपत्रात** प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत हरकती व सूचना प्राधिकृत अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उपविभाग, चांदूर रेल्वे, जिल्हा अमरावती यांच्याकडे मागविल्या होत्या ;

आणि ज्याअर्थी, प्राधिकृत अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभाग, चांदूर रेल्वे, जिल्हा अमरावती यांनी जमीन मालकांकडून आणि जमिनींच्या हितसंबंधित व्यक्तीकडून, त्याबाबतीत प्राप्त हरकती आणि सूचना विचारात घेऊन, उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, त्याच्या अहवाल राज्य शासनास सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, उक्त अहवाल विचारात घेऊन, या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली जमीन उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन करणे यासाठी आवश्यक असल्याचे ठरविले आहे ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) याच्या कलम १८ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीच्या रकाना (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गावांच्या बाबतीत, त्या अनुसूचीच्या रकाना (३) मध्ये नमूद केलेला भूसंपादन क्रमांक/गट क्रमांक असलेल्या जमिनी, त्या अनुसूचीच्या रकाना (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र हे, उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन करणे यासाठी संपादित करण्यात येईल असे घोषित करीत आहे.

**अनुसूची**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

तालुका : नांदगांव खंडेश्वर, जिल्हा : अमरावती

| अ.क्र.<br>(१) | गाव<br>(२) | भूमापन क्रमांक/गट क्रमांक<br>(३) | क्षेत्र (हेक्टर आर)<br>(४) |
|---|---|---|---|
| १ | खेड पिंपरी | १२८ | ०.१३०० |
| २ | चिखली वैद्य | ९१ | ०.१५०० |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ए. बी. गायकवाड,**
शासनाचे सचिव.

## PUBLIC WORKS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 3rd December 2020.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA HIGHWAYS ACT.

No.PPP-2016/CR-251(L.B.51)-G/Road-8.—Whereas, in exercise of the powers conferred by sub-section (2) of section 15 read with sub-section (*3*) of the said section 15 and section 17 of the Maharashtra Highways Act (LV of 1955) (hereinafter referred to as "the said Act"), and all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra had, *vide* Government Notification, Public Works Department, No.PPP-2016/CR 251(L.B.46)-G/Road-8, dated the 30th July, 2020 (hereinafter referred to as “the said notification”), declared its intention to acquire the land as mentioned in the Schedule appended to the said notification, for a public purpose i.e. for building, maintenance, management or operation of the Hindu Hriday Samrat Balasaheb Thakarey Maharashtra Samruddhi Mahamarg [State Highway (Special) No.2] (hereinafter referred to as "the said Highway" ) ; and invited the objections and suggestions from the land owners or persons interested in the said land, whose lands are included in the *Schedule* appended to the said notification to the Sub-Divisional Officer, Authorized Officer, Chandur Railway, District Amravati, within twenty-one days from date of the publication of the said notification, in the *Official Gazette* ;

And whereas, the said Sub-Divisional Officer Sub Division, Chandur Railway, District Amravati, has, after considering the objections and suggestions received from the land owners and persons interested thereof, submitted its report to the State Government as provided in sub-section (*1*) of section 18 of the said Act ;

And whereas, the Government of Maharashtra has, after considering said report, decided that the land specified in the *Schedule* appended to this notification is required for building, maintenance, management or operation of the said Highway ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 18 of the Maharashtra Highways Act (LV of 1955), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra, hereby declares that in respect of the villages specified in column (2) of the *Schedule* appended hereto, the land bearing Survey Numbers/Gat Numbers mentioned in column (3) thereof, the area specified in column (4) of that Schedule shall be acquired for building, maintenance, management or operation of the said Highway.

*Schedule*

*Description of land to be acquired*

Taluka : Nadgaon Khandeshwar, District : Amravati.

| Sr. No. (1) | Village (2) | Survey/ Gat Number (3) | Area (Hectare Are) (4) |
|---|---|---|---|
| 1 | Khed Pimpri | 128 | 0.1300 |
| 2 | Chikhali Vaidya | 91 | 0.1500 |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. B. GAIKWAD,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE